आचारांचें, आधिकारांचें नी कर्तव्याचें नियमन झालें पाहिजे अशा बुद्धीनेंच देत आहों कीं काय असें पुष्कळांस वाटण्याचा संभव आहे. अुलटपक्षीं ते दोन अडीच हजार वर्षांपूर्वीचें त्या परिस्थितींत बरे वाटलेले, अत्यंत अुत्कृष्ट वाटलेले आचार वा विचार महिलावर्गाचे आजहि तसेंच्या तसेंच नियमन करण्याचे कार्यीं किती अप्रयोज्य, असमर्थ नी अपायकारक आहेत हेंच दाखविण्यासाठीं आम्ही तीं वचनें अिथें देत आहोंत असेंहि पुष्कळांस वाटूं शकेल. पण या लेखांत आमचा तसें कांहींहि सिद्ध करण्याचा हेतु नाहीं. मनुस्मृतीच्या काळीं महिलावर्गाविषयीं काय कल्पना, भावना आणि दंडक असत ही नुसती वस्तुस्थिति काय ती दाखविण्यासाठीं हा लेख लिहिला आहे. मनुस्मृतींतील हीं वचनें अनुल्लंघ्य दंडक म्हणून, आजहि तसेंच वागणें अवश्य आहे, श्रेयस्कर आहे, म्हणून आम्ही देत नाहीं. मनुस्मृतीस धर्मशास्त्र म्हणून न मानतां तो अेक त्या काळचें आमचें समाजचित्र दाखविणारा सामाजिक अितिहासग्रंथ आहे– याच नात्यानें काय तें या लेखांत आम्हीं त्याचा अुपयोग करणार आहोंत. मनुस्मृतींतील महिला कशी होती? तर अशी. अितकेंच हा लेख सांगतो. ती तशी होती हें चांगलें कीं वाअीट, ती आजहि तशीच असावी कीं काय, अित्यादि प्रश्नांचा अूह त्याच्या कक्षेंत मुळींच पडत नाहीं. दुसरें असें, कीं अनुल्लंघ्य धर्मशास्त्र असें आम्ही मनुस्मृतीस जें मानीत नाहीं तें त्या थोर ग्रंथाविषयींची मान्यता लोकांत कमी व्हावी म्हणून नव्हे, तर ती अुलट केव्हांहि वास्तविक आहे त्याहून कमी होअूं नये म्हणूनच होय.

आपल्या वेदस्मृतिप्रभृति महान ग्रंथांची योग्यता अितकी मोठी आहे, कीं तिला टिकविण्यासाठीं ते ग्रंथ अपौरुषेय वा त्रिकालाबाधित वा सर्वज्ञ आहेत अशा कांहींच्याबाहीच अर्थवादांचें वा व्यर्थवादांचें स्तोम रचणें हिमालय पर्वत डगमगूं नये म्हणून त्याच्या पायथ्याला बांबूचे टेकूं अुभारण्याअितकेंच अनवश्यक, अनिष्ट नी हास्यास्पदच व्हावें! अितकेंच नव्हे तर त्यांस, ते आहेत तसेच, पौरुषेय, परि-

सत्य, अनुल्लंघ्य ओीश्वरी आज्ञा म्हटलें कीं त्यायोगें त्या ग्रंथांना तें ओीश्वरीय पूर्णत्व येण्याचे ठायीं अुलट ओीश्वरासच अेखाद्या मनुष्या-सारखें स्खलनशील दुर्बलत्व चिकटविलें जातें; तो ग्रंथकर्ता मनुष्य ओीश्वरप्रेषित होण्याचे ठायीं ओीश्वरच मनुष्य होऊन बसतो ! आणि ते ग्रंथहि अुपहासास्पद बनतात, हानिकारक होतात !! हें कसें होतें तें ध्यानांत येण्यासाठीं या 'मनुस्मृतींतील महिला' नांवाच्या प्रस्तुत लेखमालेलाच अगदीं तंतोतंत लागू पडेल असें मनुस्मृतींतीलच अेका श्लोकाचें अुदाहरण घेअू.

## स्त्रियांचीं नांवें कशीं असावीं आणि नसावींत ?

कोणत्या कन्यकेशीं विवाह करणें अुत्तम पक्ष यासंबंधीं विवेचन करतांना अध्याय तीनमध्यें ९, १० या श्लोकांत स्त्रियांचीं कोणचीं नांवें अुचित तेंहि मनुभगवानांनीं सहजगत्या अुल्लेखिलें आहे–

नर्क्षवृक्षनदीनाम्नीं नान्त्यपर्वतनामिकाम् ।
न पक्ष्यहिप्रेष्यनाम्नीं न च भीषण नामिकाम् ॥ (उद्वहेत्) ॥९॥
अव्यंगांगीम् सौम्यनाम्नीम् हंसवारणगामिनीम् ।
तनुलोम केश दशनाम् मृद्वङ्गीमुद्वहेत्स्त्रियम् ॥ १० ॥

नक्षत्रें, वृक्ष, नद्या, पर्वत, सर्प, सेवक आणि भीषणता यांचे वाचक असें नांव असलेली कन्यका विवाहास अयोग्य होय. जिचें नांव सौम्य आहे तिच्याशीं विवाह करणें युक्त, हा या श्लोकांचा भावार्थ आहे. अेक साधें अुपदेशवचन म्हणून वाचलें तर या सूचनेचा कांहीं विषाद वाटत नाहीं. स्त्रियांचीं नांवें भीषण नसावीं तर त्यांचे विशिष्ट गुण जे वत्सलता, कोमलता, मार्दव ते सहज व्यक्तवितील अशींच 'सौम्य' नांवें कन्यकांचीं असावीं ही सूचना किती गोड आहे ? मनूसारख्या तत्त्वज्ञ राजर्षीनें धर्मशास्त्रासारख्या गंभीर ग्रंथास रच-तांनाहि कोमल आणि सुंदर भावांची सुद्धां अशी विचारपूस करावी

दुसऱ्या श्लोकानें सांगणें, कीं वाटेल तें झालें तरी शूद्रा स्त्रीशीं लग्न केलेंस--आतां तू नी तुझी संतति पतित होऊन तुझेंदेखील ब्राह्मण्य नष्ट झालें ! – हें कृत्य करणारा धर्माध्यक्ष वा धर्मकार तर काय, पण असें नुसतें लिहिणारा ग्रंथकारहि निव्वळ भ्रमिष्टच असला पाहिजे नव्हे काय ? अर्थात् या ग्रंथाच्या पूज्य लेखकास भ्रमिष्ट म्हणण्याचें पातक ज्यांस करवत नाहीं ते आमच्यासारखे अैतिहासिक दृष्टीनेंच हा ग्रंथ वाचणारे लोक असेंच समजणार कीं, ह्या श्लोकां-पैकीं बहुधा प्रत्येक श्लोक विभिन्न काळीं भिन्नभिन्न आचार्यांनीं रचून या ग्रंथांत त्या प्रकरणांत गोवून म्हणा, घुसडून म्हणा, पण प्रक्षेपि-लेला आहे.

भूगर्भांत खणतांना अेकेका संस्कृतीच्या रचनेचीं नगरें अेकाखालच्या अेकेका थरांत जशीं दबलेलीं सांपडतात तसेंच भूतकाळच्या गर्भांत खचून अेकावर अेक चढलेले भिन्न काळच्या भिन्न समाजस्थितीचे थर म्हणजे हे अेकेक श्लोक होत. त्या थरांची परंपरा थोडक्यांत अशी –

( १ ) प्राचीनतम काळीं आर्य त्रैवर्णिक स्त्रीरत्नें 'समादेयानि सर्वशः,' सांपडेल तेथून स्वीकारावीं; तें धर्मविरुद्ध नाहीं असें समजत. त्रैवर्णिकांस शूद्र स्त्रीशीं विवाह अगदीं धर्म्य समजला जाअी अितकेंच नव्हे, तर शूद्र धर्मपत्नीचें संतान पित्याच्या वरिष्ठ वर्णाचें म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय वा वैश्यच गणलें जाअी. त्यामुळें ब्राम्हणा-दिकांत शूद्रादिकांचें रक्त सारखें मिसळत गेलें. आजच्या ब्राम्हणांत कित्येक कुळांच्या शंभराव्या पिढ्यांतील आया शूद्राणीहि असल्या पाहिजेत. अर्थात् आजचें चातुर्वर्णीय हिंदु राष्ट्र अेका रक्तबीजांचीच संमिश्र संतति आहे– अगदीं रक्तसंबंधानें निगडित अशी अेकच जात आहे.

( २ ) पण त्या पूर्वकाळीं शूद्र हे रंगानें काळे, रूपानें ढोबळ, बुद्धीनें मंद असल्यानें त्यांची ती हीनता मातेच्या बाजूनें तरी आर्यांत

निर्बंधाप्रमाणें सोडावाच लागला. त्यांच्या अुपभोगाच्या आणि सुखाच्या कक्षेस आळाच बसला. त्यांनीं आपणांवर संयमाचा ह्रा सर्वांत अधिक भार जो लादून घेतला तो त्यांचा प्रामाणिक त्यागच वर्णशुद्धीच्या ध्येयार्थं होता. त्यांना योग्य वाटलें तें त्या त्या काळच्या ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्यांनीं केलें. त्यांचा प्रश्न त्यांनीं त्यांना परवडला तसा सोडवला.

चुकलें तें त्यांचें नव्हे - तर त्यांच्या ह्या तात्पुरत्या भिन्न आणि परस्परविरुद्ध निर्बंधांस सुसंगत नी त्रिकालाबाधित मानून अेकाच ग्रंथकाराच्या नांवावर अेकाच ग्रंथांत दडपून देणाऱ्या 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' सनातनी प्रवृत्तीचें होय. मनुस्मृतींतील शद्व न् शद्व आजहि मान्य असलाच पाहिजे नी ती अगदीं सुसंगत श्लोकांनींच भरली आहे; अेकाच मनूनें लिहिली आहे असें मानणारे 'सनातनी' हें विसरतात, कीं त्या ग्रंथास असें सुसंगत ठरविण्यासाठीं तो अेकाच ग्रंथकारानें लिहिला असें म्हणतांच तो लिहिणारा मात्र भ्रमिष्ट ठरतो ! ग्रंथाचा मान वाढविण्याच्या धांदलींत ग्रंथकारासच मूर्खांत ओढलें जात आहे याचें त्यांस भान राहात नाहीं !

पण अैतिहासिक दृष्टीनें ही सारी आपत्ति टळते. हे श्लोक अेका ग्रंथकाराचे वा अेका काळचे नसून ते भिन्नभिन्न काळचे निर्बंध कोणींतरी पुढें संकलित करून ह्या 'संग्रहां'त गोंविले. तो प्रत्येक श्लोक परस्परविरुद्ध असला तरी अेकेका काळच्या अितिहासाचें पान आहे आणि ते सारे अेकत्र ओळीनें वाचले, कीं ह्या 'वर्ण नी विवाह' विषयाचा क्रमवार विकास नी अितिहास आपल्या पुढें चित्रपटासारखा आकर्षक सुसंगतीनें अुभा राहातो. )

✠ ✠ ✠

समुद्रानें नदी तशी भर्त्याच्या संगतीनें स्त्री अुत्कर्षंहि पावते. अक्षमाला ही नीच जातीची स्त्री वशिष्ठानें वरली. मन्दपाल अृषीशीं शारंगीचा संयोग झाला. अशा आणखी कित्येक चण्डालप्रभृति हीन जातींच्या स्त्रिया अुत्तम पति प्राप्त झाल्यानें जगताला पूजनीय व्हाव्या अितक्या उत्कर्षल्या ! ( वशिष्ठानें चाण्डालीशीं लग्न लावलें. 'वशिष्ठश्चाण्डालीमुपयेमे' अशी श्रुतीहि आहे. या चाण्डाल पत्नीच्या थोरवीनें ती वशिष्ठाप्रमाणें जगत्पूज्य झाली. सप्तर्षींच्या-सह पूजनीय स्थान पावणारी अरुंधती ती हीच चण्डालकन्या अक्ष-माला होय. स्कन्दपुराणांतहि ती कथा आहे. या श्लोकांत चाण्डा-लादि हीन समजलेल्या कन्यांचे ब्राम्हणांशीं झालेले हे विवाह जाति-बाह्य म्हणून निंदिलेले नाहींत; अितकेंच नव्हे, तर हितपरिणामीं म्हणून प्रशंसेनें अुल्लेखिले आहेत. ते अेकदोनच ठिकाणीं झाले नाहींत तर 'अशा प्रकारचीं अनेक हितपरिणामीं अुदाहरणें 'हि स्पष्ट निर्देशलीं आहेत. पुन्हा 'स्त्रीरत्नं दुष्कुलादपि' या मनूच्या दुसऱ्या एका नियमाचाहि हाच परिणाम होत असला पाहिजे. ब्राम्ह-णादिकांशीं चण्डालांच्या स्त्रियादेखील धर्म्य, विधियुक्त विवाह लावीत आणि त्यांची जात पतीची तीच ठरून त्या अृषीतुल्य थोरवीस चढून अृषिवत् पूजिल्याहि जाऊं शकत. देशस्थ ब्राम्हणांची मुलगी कोंकणस्थ ब्राम्हणांनींहि करणें नाहीं; बंगाली ब्राम्हणानें तर नाहींच नाहीं, हाच आमच्या पूर्वजांचा अपरिवर्तनीय सनातन धर्म होय ! असें मनुस्मृतीच्याच शपथेवर सांगणारे आमचे सनातनी धर्मबांधव हे वशिष्ठादिक चाण्डालकन्यका वरणारे नी मनूनें प्रशंसिलेले पूर्वज 'आमच्या पूर्वजांतले नव्हत ! ' म्हणून सांगूं धजतील काय ? वशिष्ठादि गोत्रज ब्राम्हणांची कोणची ना कोणची प्रपितामही तरी चांडालकन्या ही होती; आम्हां ब्राम्हणांत चांडालांचें रक्त आहे. 'हीनयोनि अस्पृश्यादिक' ब्राम्हणांचे मावसभाऊ आहेत हें स्पष्ट आहे !

✠ ✠ ✠

